**महाराष्ट्र शासन** **कृषि विभाग**

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना

शेतकरी अनुसूचित जाती (SC)/ अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील असल्यास खालीलप्रमाणे अटी व शर्तीनुसार पात्र असल्यास खालील बाबींचा लाभ घेण्याकरीता mahadbt farmer किंवा http://mahadbtit.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करता येईल.

1.लाभार्थी हा अनुसूचित (SC)/ अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील शेतकरी असावा.
2.शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असले पाहीजे.
3.शेतकऱ्याकडे त्याचे स्वताचे नावे किमान 0.40 हेक्टर व कमाल 6.00 हेक्टर शेत जमीन असली पाहीजे.
4.शेतकऱ्याचे नावे जमीधारणेचा 7/12 दाखला व 8अ दाखला असणे आवश्यक आहे. (नगरपंचायत/नगर पालीका/ महानगर पालीका क्षेत्राबाहेरील)
5.शेतीचे प्रस्तावित विहीरीचे जागेपासून 500 मीटर /1640 फुटाच्या आत सार्वजनिक पाण्याचा स्त्रोत नसावा.
6.भुजल सर्व्हेक्षण विकास यंत्रणा,वरीष्ठ भुवैज्ञानिक यांचेकडील पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. GSDA च्या व्याख्येनुसार semicritical / critical / over exploited क्षेत्रामध्ये नविन विहीर घेता येणार नाही

| अ.क्र. | बाब | अनुदान मर्यादा (रुपये) |
|---|---|---|
| 1 | नविन सिंचन विहीर | 4,00,000 |
| 2 | जुनि विहीर दुरुस्ती | 1,00,000 |
| 3 | शेततळ्याचे प्लॅस्टीक अस्तरीकरण | 2,00,000 किंवा प्रत्यक्ष खर्चाचे 90 टक्के |
| 4 | इनवेल बोअरींग | 40,000 |
| 5 | विज जोडणी आकार | 20,000 किंवा प्रत्यक्ष खर्चाचे 90 टक्के |
| 6 | विद्युत पंपसंच/डिझेल इंजीन | 40,000 |
| 7 | सोलर पंप(विज जोडणी आकार व पंपसंच ऐवजी) | 50,000 किंवा प्रत्यक्ष खर्चाचे 90 टक्के |
| 8 | HDPE/PVC पाईप | 50,000 किंवा प्रत्यक्ष खर्चाचे 90 टक्के |
| 9 | सुक्ष्म सिंचन संच | |
| 9.1 | तुषार सिंचन संच पुरक अनुदान | एकुण 90 टक्के अनुदान मर्यादेत |
| 9.2 | ठिबक सिंचन संच पुरक अनुदान | एकुण 90 टक्के अनुदान मर्यादेत |
| 10 | बैलचलीत/ट्रॅक्टर चलीत औजारे | 50,000 |
| 11 | परसबाग | 5,000 |

**लाभार्थिंची ऑनलाईन लॉटरीव्दारे वरील बाबींकरीता निवड झाल्यास** mahadbt farmer **किंवा** http://mahadbtit.gov.in **या संकेतस्थळावर खालिलप्रमाणे कागदपत्रे अपलोड करावी.**

१. नविन 7/12 दाखला (डिजिटल किंवा तलाठी यांच्या स्वाक्षरीचा) (7/12 सामाईक असल्यास इतर सदस्यांचा संमतीलेख सादर करणे आवश्यक)
२. नवीन 8 अ दाखला (डीजीटल किंवा तलाठी यांच्या स्वाक्षरीचा)
३. जातीचा दाखला (जातीचा दाखला लग्नापुर्वीचा असल्यास, लग्नापुर्वीचे व लग्नानंतरचे नाव एकाच व्यक्तीचे असल्याबाबत प्रतिज्ञालेख सादर करणे आवश्यक)
४. आधार कार्ड व बँक पास बुक प्रत
५. विज जोडणी/सोलर पंप करीता निवड असल्यास क्र. 1 ते 4 कागदपत्रे व MSEB चे कोटेशन / ॲडव्हाईस
६. विद्युत मोटरपंप करीता निवड असल्यास क्र. 1 ते 4 कागदपत्रे व सोबत विज जोडणी असल्याचा पुरावा उदा. MSEB चे बिल किंवा कोटेशन व पैसे भरल्याची पावतीची झेरॉक्स
७. HDPE/PVC पाईप करीता निवड असल्यास 1 ते 4 कागदपत्रे व सिंचन सुविधा पुरावा

अधिक माहितीकरीता कृषि विकास अधिकारी (जिल्हा परिषद अमरावती) किंवा कृषि अधिकारी पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधावा

सौजन्य :- कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती